# धन्य ती मुक्ताई !

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A33

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**धन्य ती मुक्ताई ! : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

# धन्य ती मुक्ताई !

## प्रथम आवृत्तीची प्रस्तावना

अठरा वर्षांच्या आपल्या अल्प जीवनात या भूमीवर गंगोदकाचं अमृतसिंचन करून गेलेल्या 'मुक्ताई' चे पाऊलठसे वाचकांना अस्पष्ट का होईनात, दिसावे असा हा अल्प प्रयत्न मी केला आहे.

'ज्ञानराज' 'मुक्ताई' विशेषांकासाठी मी छोटा लेख लिहून पाठवला. अंक प्रकाशित होऊनही गेला. पण मनात रिघून बसलेली मुक्ताबाई दुसरं काही सुचू देत नव्हती. यावर एक छोटी कादंबरी लिहून मन मोकळं करावं असे विचार येत होते.

त्याच सुमारास 'धनुर्धारी'चे श्री. सापळे आले आणि 'धनुर्धारी' दिवाळी अंकासाठी ही कादंबरी लिहून देण्याचं मी मान्य केलं. त्यांच्यातर्फे प्रिया प्रकाशनचे श्री. बांदोडकर यांचा परिचय होण्याचा सुयोग आला. प्रकाशनासाठी ही कादंबरी त्यांनी घेतली. ओझरती चित्रकल्पना देताच चित्रांचं स्केचही पाठवलं. कादंबरी त्वरित प्रकाशित होत आहे याबद्दल प्रकाशकांना धन्यवाद!

'ज्ञानराज' संपादकांचं पत्र कादंबरी लेखनासाठी प्रेरणादायी होते म्हणून त्यांचे आभार मानणे उचित वाटतं.

माझ्या काही स्नेही मंडळींच्या सूचनेवरून कादंबरीच्या शेवटी मुक्ताबाईचे अभंग दिले आहेत.

# प्रेरणा

फेब्रुवारी महिन्यातली गोष्ट. 'ज्ञानराज' अंकाच्या संपादकांचं पत्र आलं– ज्ञानराज सेवा मंडळातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे 'श्री ज्ञानदेवमहाराज महोत्सव' सप्ताह साजरा होणार आहे. या वर्षी संत कवयित्री 'मुक्ताबाई' यांच्या 'जन्मसप्तशताब्दी' निमित्ताने 'ज्ञानराज' चा 'मुक्ताई' विशेषांक प्रसिद्ध करणार आहोत, तेव्हा या अंकाकरिता मुक्ताबाईसंबंधी एक लेख पाठवावा.

मुक्ताबाईवर लेख? मी काय लिहिणार? कारण संतसाहित्याचा प्रांत मला अपरिचित–अनोखा. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ इत्यादी संतांची नावे माहीत होती. त्यांची त्रोटक चरित्रे वाचली होती. रोज सुप्रभाती रेडिओवर संतरचित अभंगांचे शब्द–सूर कानीमनी घुमत असतात पण–

पण हे सगळे फुललेल्या बगिच्यावरून ओझरती नजर टाकीत पुढे निघून जाण्यासारखं होतं.

बाराही मास बहरलेल्या भक्तीच्या मळ्यात आपण कधी गेलो नाही, डोळे भरून तिथलं काही पाहिलं नाही. आत्मज्ञान, आंतरिक भक्ती आणि लौकिक व्यवहार, यांच्या 'त्रिवेणी संगमा'ची दृष्टिभेट घडली नाही. त्या 'शांति संगमा'तला एकही मधुबिंदू चाखला नाही... खरंच, त्या मधुबिंदूची चव असते तरी कशी... मिसळलेला तो अलौकिक भक्तीचा सुगंध कसा........ हा मला पडलेला प्रश्न, म्हणजे या बाबतीत सगळं अज्ञान. सभोवार सारं धुकंच! सारं अस्पष्ट. काय लिहू?

माझी लेख लिहिण्याची असमर्थता दिलगिरीपूर्वक व्यक्त करणारं कार्ड लिहायला घेतलं, आणि–

आलेल्या पत्रातल्या 'जन्मसप्तशताब्दी' शब्दावर नजर क्षणकाल स्थिरावली. 'सप्तशताब्दी!'

गेली सातशे वर्षे जी संत कवयित्री–नुसती कवयित्रीच नव्हे तर महायोगिनी, ध्रुवताऱ्यासारखी अढळपदी आहे, तिचा आपण परिचय करून घ्यायला हवा. जन्मसप्तशताब्दीच्या रत्नभांडारांनी भरलेल्या आदरांजलीत आपण एक तुलसीपत्र टाकायला हवं.

कार्ड बाजूला सारलं आणि संतसाहित्याच्या अनोख्या प्रांतात दबकत चार पावलं टाकली. मुक्ताबाईंविषयी मिळेल ते गाठी बांधलं. तिच्याविषयी तशी स्वतंत्र अशी फारच थोडी माहिती मिळते. तिचं वेगळं असं जीवनचरित्र नाही. कारण ती वेगळी कधी नव्हतीच. जन्मापासून चारी भावंडे–निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ता अखेरपर्यंत एकत्र होती. कधी विखुटी पडलीच नाहीत. चारी भावंडांच्या चरित्रातच तिचं जीवन सामावलेलं आहे.

नामदेव, जनाबाई, चांगदेव इत्यादी संतांच्या वाङ्मयातून–त्यांच्या अभंग काव्यातून मुक्ताबाईविषयी जे जे उल्लेख मिळाले ते एकत्रित केले. ज्ञानेश्वरी–तिच्या लाडक्या ज्ञानदादाचा गीता–टीका ग्रंथ हा तर तिचा दुसरा–छे ! तिसरा प्राण. ज्ञानदादा तिचा दुसरा प्राण. ज्ञानेश्वरी तिच्या रोमरोमी भिनलेली. त्या भावंडांच्या जीवनाचं प्रतिबिंब त्यात उमटलेलं आहे.

या निमित्ताने संतवाङ्मयाचा थोडासा परिचय झाला. ज्ञानेश्वरीतलं रत्नभांडार नजरेला पडलं.

....अभंग काव्य मन:पटलावर रेखलं गेलं आणि....ते लौकिक, असं आपलं सगुण रूप धारण केलं. तिची हालचाल नजरेसमोर प्रतीत होऊ लागली. तिची वेदवाणी काकडारतीच्या घंटानादासारखी कानात उमटू लागली. अंतरंग धूप–सुगंधाने भरून गेलं आणि लेखणी हाती आली.

मुक्ताबाईच्या अठरा वर्षांच्या अल्प जीवनातील तिची विविध लौकिक रूपे दिसू लागली. तरीसुद्धा तिचं खरं रूप–आदिशक्ती–आदिमाया हे रूप क्षणमात्रही नजरेसमोरून दूर सरकत नव्हतं. तिच्या जीवनातले अनेक प्रसंग याची साक्ष देतात. पाहा ना!

कोरान्नासाठी दारोदारी हिंडत असता, लोकनिंदेने एकदा व्यथित होऊन ज्ञानेश्वर ताटी बंद करून बसले असता, पाच-सहा वर्षांच्या चिमुकल्या मुक्ताने त्यांना केलेला उपदेश, हा प्रेमळ मातेने-साक्षात आदिमायेने केलेलाच उपदेश नाही का? ही शक्ती दुसऱ्या कुणाच्या ठायी असणे शक्य आहे का?

भक्तसम्राट नामदेवाचा तिने अहंकार घालवला तो प्रसंग.

गोरोबाकाकांच्या हाती थापटणे देऊन जमलेल्या मडक्यांचा (संतांचा) कच्चे-पक्केपणा बाह्यत: सहजगत्या कुतूहलाने पण ठसक्यात सांगणे (तिच्या बोलण्यातला ठसका ही तिची अधिकारवाणीच असे) हा प्रसंग.

वृद्धयोगी चांगदेवाला बाळ म्हणून, आपणाला त्याची आई म्हणणे...

याखेरीज हरघडीच्या तिच्या लौकिक जीवनात असे बरेच प्रसंग दृष्टीस पडतात आणि अध्यात्मात-ब्रह्मज्ञानात परिपूर्णतेला पोहोचलेली ही आदिशक्ती, आदिमायाच होती हे मनोमनी प्रत्ययाला येतं.

तिचं एकंदर जीवन लौकिक असूनही अलौकिक, तशी तिची काव्यशक्तीही आगळी. मनाला स्तिमित करणारी, नतमस्तक बनविणारी.

सामाजिक अन्यायातून निर्माण झालेली अनाथ अवस्था, प्रतिकूल परिस्थिती, प्रखर निंदा, दारुण दु:ख यांच्या धगधगत्या अग्निकुंडात ती आपलं वैशिष्ट्य टिकवून राहिली. तिचे ताटीचे अभंग हे तिचे वैशिष्ट्य.

'एक रूप दिसे, सर्वांघटी भासे। एक हृषिकेश व्यापियले।।' हे तिच्या विचार आचाराचं मूळ आणि तिच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. तिच्याच नव्हे तर सगळ्या संतांच्या-संतमात्राच्या आचार विचाराचं हे सूत्र आहे. माणुसकी हा त्याचा रोजच्या व्यवहारातला अर्थ.

सर्वांभूती आत्मा-म्हणजे माणसाचा जीव (आत्मा) इथून तिथून सगळीकडे सारखाच. त्यात अद्वैत कुठं नाही. भेदाभेद नाही, अतएव संघर्ष नाही.

पण आज संघर्ष-अंतर्बाह्य संघर्षच! रोजच्या व्यवहारात आणि माणसाच्या मनात संघर्ष सारखा वाढतो आहे. विविध सुखोपभोगासाठी स्पर्धासंघर्ष चालू आहेत. माणूस यंत्रे निर्माण करता करता स्वत:च एक यंत्र बनला आहे. पण ज्या सुखोपभोगासाठी आयुष्यभर खटाटोप केला ते सगळं मृगजळासमान होतं अशी आयुष्याच्या अंती प्रचिती येते. समाधान, मन:स्वास्थ्य आणि शांती याचा एक थेंबही मुखी पडत नाही. मृगजळाला झुळझुळत्या झऱ्याचं अस्तित्व कसं लाभणार!

समाधान, मन:स्वास्थ्य आणि शांती ही खऱ्या सुखाची गंगोत्री आहे.

आज ही गंगोत्रीच गुप्त झाली आहे. भगिरथाने माणूसमात्राच्या सुखासाठी स्वर्गातून आणलेली ही गंगोत्री, पृथ्वीवरचे पसरत चाललेले संघर्ष आणि वाढते अनाचार पाहून, देवांनी परत स्वर्गात नेली का?

पण या भूमीवर युगानुयुगे संतांची पावलं फिरतात, अंधाराच्या पाऊलवाटेवर प्रकाश दिसतो, हा केवढा दिलासा!